# सराफा दुकानामध्ये गर्दीचा फायदा घेऊन हातचलाखीने सोन्या-चांदीची दागिणे लांबविणारी नागपूरची महिला गँग स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात.

फिर्यादी नामे श्री कौस्तुभ अशोक कठाणे, रा. सराफा लाईन, वर्धा यांचे व श्याम ज्वेलर्स दुकानामध्ये दिनांक २४-१०-२०२१ चे १३.३० ते १५.४५ वा. चे दरम्यान बुरखाधारी दोन अनोळखी महिला दागिणे खरेदीच्या बहाण्याने दुकानात येऊन गर्दीचा फायदा घेऊन सोन्याचे १२ पदक (वजन ५८.७७० ग्रॅम की. ३,२५,०००/-) असलेला एक बॉक्स व तोरड्यांचे १८ जोड (वजन १२६२ ग्रॅम की. ८०,०००/-) असा एकूण किंमत ४,०५,०००/- रू. चा माल चोरून नेल्याबाबत पोलीस स्टेशन वर्धा शहर अप.क्र. १३६३/२०२१ कलम ३८०, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखे मार्फत सदर गुन्ह्याचा समांतर तपास सुरु असतांना तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीतांना निष्पन्न करून व गोपनीयरित्या सापळा रचून महिला आरोपी १) बुशरा परवीन वल्द अब्दुल रशीद उर्फ बुशरा परवीन राजिक शेख, वय ३५ वर्षे, रा. आर्यनगर, नागपूर हिला दि.१२-१०-२०२१ रोजी व आरोपी क्र. २) निखत परवीन उर्फ निक्को शमीम खान, वय ३२ वर्ष, रा. मुडलीअर ले-आऊट, शांतीनगर, नागपूर, ह. मु. मानकापूर, गोधणी, नागपूर हिला दि.१३-१०-२०२१ रोजी नागपूर येथून ताब्यात घेऊन त्यांचेकडून एकूण किंमत ३,२५,०००/- रू. चा माल जप्त करून गुन्हा उघडकीस आणला.

मा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत होळकर, अपर पोलीस अधीक्षक श्री. यशवंत सोळंके मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा श्री. पियुष जगताप यांचे मार्गदर्शनात पो.नि. स्था.गु. शा वर्धा श्री. संजय गायकवाड यांचे निर्देशाप्रमाणे पोउपनि. गोपाल ढोले, पोउपनि. सौरभ घरडे व पोलीस अंमलदार निरंजन वरभे, नरेंद्र डहाके, रणजित काकडे, हमीद शेख, प्रमोद पिसे, रामकिसन इप्पर, दिनेश बोथकर, अनुप कावळे, अक्षय राऊत महिला पोलीस अंमलदार शाहीन सय्यद, शुभांगी पुसदेकर यांनी केली.